**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः13.10.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- देशभरात काल दसरा म्हणजेच विजयादशमीचा सण पारंपरिक हर्षोल्हासात साजरा.

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दक्षिण आफ्रिकेतील देशांच्या दौऱ्यावर.

- पंतप्रधान आंतरवासिता योजनेसाठी ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी सुरू.

आणि

- पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारताचा बांगलादेशवर मालिका विजय. तर महिला संघाचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध आज सामना.

**विजयादशमी**

देशभरात काल दसरा म्हणजेच विजयादशमीचा सण पारंपरिक हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील लाल किला मैदानावर दसरा सोहोळ्यात भाग घेतला. वाईटावर चांगल्याचा विजय याचं प्रतीक म्हणून रावण, कुंभकर्ण आणि मेघनाद यांच्या पुतळ्यांचं यावेळी दहन करण्यात आलं. श्री धार्मिक लीला समितीनं आयोजित केलेल्या या दसरा कार्यक्रमाला हजारो लोक उपस्थित होते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दार्जिलिंग मध्ये लष्कराच्या जवानांबरोबर शस्त्रपूजा करून विजयादशमी साजरी केली. शास्त्र आणि शस्त्राला समान दर्जा देणारा भारत हा एकमेव देश असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. समृद्ध, समर्थ, विकसित महाराष्ट्र घडवायचा असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात केलं. आझाद मैदान इथं आयोजित या मेळाव्यात बोलताना त्यांनी राज्य सरकारनं आजवर केलेल्या कामगिरीला उजाळा दिला. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या दसरा मेळाव्यात उपस्थित कार्यकर्त्यांना मराठी माणसाच्या एकजुटीची शपथ दिली आणि शिवसेनाप्रमुखांना अभिप्रेत असलेला महाराष्ट्र

घडविण्यासाठी मशाल धगधगत ठेवण्याचं आवाहन केलं. मुंबईत शिवाजी पार्क इथं आयोजित दसरा मेळाव्यात ते बोलत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरमधील रेशीमबाग मैदानावरील विजयादशमी सोहोळयासाठी मुख्य अतिथि म्हणून इस्रोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के. राधाकृष्णन तसंच सरसंघचालक मोहन भागवत उपस्थित होते. सर्व सण आणि उत्सवामध्ये सर्वांचा सहभाग असला पाहिजे असं भागवत यावेळी म्हणाले.

काही ओटीटी मंचांवर पसरलेली असभ्यता सांस्कृतिक मूल्यांच्या ऱ्हासास कारणीभूत आहे आणि कायदेशीर व्यवस्थेद्वारे ती नियंत्रित करणं आवश्यक असल्याचं स्पष्ट मत भागवत यांनी व्यक्त केलं.

**राष्ट्रपती दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून अल्जेरिया, मॉरिटानिया आणि मलावीच्या आठवडाभराच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या तीन आफ्रिकन देशांना भारतीय राष्ट्रपतींची ही पहिलीच भेट आहे. आफ्रिकन युनियनला भारताच्या अध्यक्षतेखाली G20 चे स्थायी सदस्य बनवल्यानंतर एक वर्षानंतर हा दौरा होत आहे. या दौऱ्यात राष्ट्रपती द्विपक्षीय बैठका घेतील आणि तिथल्या भारतीय समुदायाशी चर्चाही करतील. भारताचे आफ्रिकेतील देशांसोबतचे संबंध वाढवणे आणि मजबूत करणे हा मुर्मू यांच्या यांच्या दौऱ्याचा उद्देश आहे.

**बिर्ला**

लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला आजपासून 17 ऑक्टोबरपर्यंत जिनेव्हा येथे होणाऱ्या IPU  अर्थात इंटर-पार्लमेंटरी युनियन- च्या 149 व्या बैठकीत भारतीय संसदीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार आहेत. शांततापूर्ण आणि शाश्वत भविष्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवनिर्मितीचा उपयोग या विषयावर ते या बैठकीत उपस्थितांना संबोधित करतील. त्याचबरोबर बिर्ला IPU च्या कार्यकारी मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहतील आणि या महिन्याच्या 14 तारखेला जिनिव्हामधल्या भारतीय नागरिकांबरोबरच आपल्या समपदस्थानादेखील भेटतील. शिष्टमंडळात राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंग, दोन्ही सभागृहांचे सरचिटणीस आणि इतर संसद सदस्यांचा समावेश आहे. IPU मध्ये 180 संसद सदस्य आणि 15 सहयोगी सदस्य आहेत. सदस्यांमध्ये चीन, भारत आणि इंडोनेशिया सारख्या मोठ्या देशांच्या संसदेचा तसेच काबो वर्दे, सॅन मारिनो आणि पलाऊ सारख्या लहान देशांचा समावेश आहे.

**शांतीसेना**

शांतिसेनेच्या माध्यमातून भारत हा शांततेसाठी मोठं योगदान देणारा देश असून, लेबनॉनमधील संयुक्त राष्ट्रांच्या सैन्याच्या विधानाचं भारत समर्थन करतो असं संयुक्त राष्ट्रातील भारताच्या कायमस्वरूपी मिशननं म्हटल आहे. लेबनॉनमध्ये इस्त्रायली हल्ल्यात संयुक्त राष्ट्रांचे दोन शांती सैनिक जखमी झाल्यानंतर समाज माध्यमातील संदेशात शांती रक्षकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं म्हटलं आहे. इस्त्रायली वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, इस्त्रायली लष्कराने जखमी झालेल्या शांती सैनिकांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. भारताने लेबनॉन आणि इस्त्रायलमधील बिघडलेल्या सुरक्षा परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करून सर्व बाजूंनी संयुक्त राष्ट्रांच्या परिसरांना लक्ष्य केले जाणार नसल्याच्या आश्वासनाचा आदर केला पाहिजे असं म्हटलं आहे.

**नौसेना अभ्यास**

मलबार 2024 अंतर्गत भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेच्या नौदलांचा संयुक्त सागरी सराव विशाखापट्टणम इथं गेल्या 9 ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. सागरी सहकार्याला प्रोत्साहन देणे हा या सरावाचा उद्देश आहे. इंडो-पॅसिफिक प्रदेशात परस्पर कार्यक्षमता वाढविणे आणि भविष्यातील सराव या विषयांवर वरिष्ठ नौदल अधिकाऱ्यांमध्ये उच्चस्तरीय बैठकादेखील या दरम्यान होत आहेत. सागरी सुरक्षा सुधारण्यासाठी हा संयुक्त सराव , सहकार्य आणि चर्चा निर्णायक ठरणार आहे. सरावाचा बंदर भागातील टप्पा पूर्ण झाल्यावर, उद्यापासून सागरी टप्प्यावरील सारवाला सुरुवात केली जाणार आहे. या सरावामध्ये बंगालच्या उपसागरात परिणामकारक समन्वय राखण्याच्या दृष्टीने चर्चा केली जाणार आहे.

**आंतर वासिता**

पंतप्रधान इंटर्नशिप अर्थात आंतरवासिता योजनेसाठी ऑनलाइन पोर्टलवर कालपासून नोंदणी सुरू झाली आहे. या महिन्याच्या 25 तारखेपर्यंत ही नोंदणी सुरू राहणार आहे. या योजनेसाठी पोर्टलवर आतापर्यंत 193 कंपन्यांनी 91 हजार आंतरवासिता संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. 2024-25 या आर्थिक वर्षात 1 लाख 25 हजार आंतरवासिता संधी उपलब्ध करून देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. हा प्रायोगिक तत्वावरील उपक्रम असून यासाठी एकंदर 800 कोटी रुपये खर्च येणार आहे. 21 ते 24 वर्षे वयोगटातील एक कोटी उमेदवारांना पाच वर्षांसाठी 12 महिन्यांची इंटर्नशिप देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. आंतरवासिता उमेदवाराला एका वर्षासाठी दरमहा 5 हजार रुपये तर एक रकमी अनुदान म्हणून 6 हजार रुपये दिले जाणार आहेत. 737 जिल्ह्यांमध्ये तेल, वायू आणि ऊर्जा,

प्रवास आणि आदरातिथ्य, ऑटोमोटिव्ह आणि बँकिंग आणि वित्तीय सेवांसह 24 क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध आहेत.

**बांगलादेश**

भारताने बांगलादेश सरकारला हिंदू आणि सर्व अल्पसंख्याक आणि त्यांची प्रार्थनास्थळे, विशेषत: सणासुदीच्या काळात सुरक्षितता आणि सुरक्षा करण्याचे आवाहन केलं आहे. एका निवेदनात परराष्ट्र मंत्रालयाने ढाका येथील तंतीबाजार येथील पूजा मंडपावर झालेला हल्ला आणि सातखीरा येथील पूजनीय जेशोरेश्वरी काली मंदिरात झालेल्या चोरीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. हे हल्ले खेदजनक असून मंदिरे आणि देवतांची विटंबना आणि नुकसान जाणीवपूर्वक केलं जात असल्याचं भारताने म्हटलं आहे.

**बाबा सिद्दीकी**

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांचा काल मुंबईत गोळीबारात मृत्यू झाला. सिद्दीकी यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं मात्र डॉक्टरांनी त्यांनी मृत घोषित केलं. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही तसेच कायदा हातात घेणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा निर्धार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी दोन संशयितांना अटक करण्यात आली असून एक अद्याप फरार आहे. यासंदर्भातील सुनावणी जलदगती न्यायालयात होणार असलयाची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली आहे.

**मैसूर दसरा**

म्हैसूरमध्ये 10 दिवस सुरू असलेल्या म्हैसूर दसरा महोत्सवाची सांगता काल विजयादशमीच्या दिवशी भव्य जांबू सावरी म्हणजेच हत्तीच्या मिरवणुकीने झाली. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी, कुंभ लग्नात दसरा हत्ती अभिमन्यूने वाहून नेलेल्या 750 किलो सोन्याच्या हौद्यात विराजमान देवी चामुंडेश्वरीला पुष्पहार अर्पण केला. यानिमित्त 95 हजार दिव्यांनी उजळलेला म्हैसूर राजवाडा आणि नेत्रदीपक ड्रोन प्रदर्शनासह फटाक्यांची आतषबाजी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. वाईटावर चांगल्याचा विजय असलेला हा दसरा उत्सव 15 व्या शतकात विजयनगरच्या राजांनी प्रथम साजरा केला आणि पुढे म्हैसूरमधील वाडियार  राजघराण्याने तो सुरू ठेवला.

**कोलकाता डॉक्टर**

आपल्या 10 कलमी मागण्यांसह उपोषणावर असलेल्या कनिष्ठ डॉक्टरांना पाठिंबा आणि एकजूट दाखवण्याकरता पश्चिम बंगालमधील वरिष्ठ डॉक्टर उद्या सकाळी 6 वाजल्यापासून 48 तासांसाठी काम बंद ठेवणार आहेत. पश्चिम बंगाल मधील डॉक्टरांच्या संयुक्त व्यासपीठाच्या वतीने डॉ. स्वरोद्योत मुखर्जी यांनी ही माहिती दिली. दरम्यान, या काळात आपत्कालीन सेवा मात्र सुरू राहणार आहेत.

**क्रिकेट**

पुरुषांच्या वीस षटकांच्या क्रिकेटमध्ये, भारतानं काल हैदराबाद इथं तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात बांगलादेशचा 133 धावांनी पराभव करत ही मालिका 3-0 अशी जिंकली. प्रथम फलंदाजी करताना भारताने 298 धावा केल्या. क्रिकेट जगतातील या दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च धावा ठरल्या. हा धावांचा  पाठलाग करताना बांगलादेश संघ 164 धावा करु शकला. संजू सॅमसननं 47 चेंडूत 111 तर कर्णधार सूर्यकुमार यादवनं 35 चेंडूत 75 धावा केल्या. संजू सॅमसनला सामनावीर आणि हार्दिक पांड्याला मालिकावीर घोषित करण्यात आलं. संयुक्त अरब अमिराती इथं सुरू असलेल्या महिलांच्या वीस षटकांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज शारजाह इथं भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. संध्याकाळी 7.30 वाजता हा सामना सुरू होईल. तर इंग्लंडचा सामना स्कॉटलंडविरुद्ध होणार आहे. तर काल झालेल्या इतर दोन सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं बांगलादेशचा पराभव केला. तर न्यूझीलंडने श्रीलंकेचा 8 गडी राखून पराभव केला.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**